# रे.क.नं. ५१/२०१४ मधील निशाणी १७ वरील आदेश

१. प्रतिवादी क्र. ७ यांनी सदरचा अर्ज कैफियत व म्हणणे देणेस झालेला विलंब माफ होवून कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्र. ७ यांनी वादीचे दावेस कैफियत व म्हणणे देणेस विलंब केला आहे. परंतु प्रतिवादी क्र. ७ यांच्या पत्नीस दाव्याचे समन्स दिल्याने व प्रतिवादी क्र. ७ यांची पत्नीचे नुकतेच बाळंतपण झाले होते. त्या कारणाने तिने समन्सबाबत वेळीच माहिती न दिल्याने प्रतिवादी क्र. ७ ला कैफियत व म्हणणे वेळेत देता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ ला कैफियत व म्हणणे देणेस विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र. ७ यांनी कैफियत देणेस जाणूनबुजून टाळाटाळ केलेली नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ७ यांना कैफियत व म्हणणे देणेस झालेला विलंब माफ होवून कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मागत आहेत.

३. वादी यांनी म्हणणे देवून प्रतिवादी क्र. ७ यांनी अर्जात केलेली कथने साफ चुकीची आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा. जर अर्ज मंजूर करणेचा झालेस प्रतिवादी क्र. ७ यांना रुपये ५,०००/- इतकी कॉस्ट करण्यात यावी अशी विनंती केली आहे, असे कथन केले आहे.

४. वादीतर्फे वकील श्री.एस.एस.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला तर प्रतिवादी क्र. ७ तर्फे वकील श्री.व्ही.व्ही.धुंदरे यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी अनुक्रमे अर्ज व म्हणण्यातील मजकुरानुरुप युक्तिवाद केला.

५. सदरचा दावा वादी यांनी वाटपासाठी, हक्कज्ञापनासाठी व कायम मनाई ताकीद होणेसाठी दाखल केला आहे. यातील प्रतिवादी क्र. ७ यांना कैफियत व म्हणणे देण्याकरिता विलंब झालेला आहे. सदर झालेला विलंब माफ होवून प्रतिवादी क्र. ७ यांना कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर झालेला विलंब माफ न केलेस कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी न दिलेस प्रतिवादी क्र. ७ यांना त्यांचे बचावास संधी दिली नाही तर त्याला न्याय्य हक्कापासून वंचित

रहावे लागणार आहे. त्यामुळे सदर परवानगी मिळणे न्यायोचित आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ यांना कैफियत व म्हणणे देणेस झालेला विलंब माफ करुन कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेस प्रतिवादी क्र. ७ पात्र आहे. सबब, सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ७ यांनी कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो. त्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ७ यांनी रुपये २००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी देण्यात येते.

३. अर्जाचा खर्च अंतिम निकालावर अवलंबून राहील.

सही/-
**(एच.व्ही.कुलकर्णी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांक- २४/१०/२०१७